# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८४५/२०१८ मधील निशाणी २०–अ वरील आदेश
## (सौ.रेश्मा साबळे वि. श्रीकांत साबळे)

अर्जदाराने सामनेवाला याचेकडून अंतरीम पोटगी मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात असे कथन आहे की, तिने मूळ अर्ज फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे दाखल केलेला असून सदर अर्जातील सर्व मजकूर या अर्जाचा भाग समजण्यात यावा असे कथन केले आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे तिचा व सामनेवाला याचा विवाह दिनांक २०/०५/२००३ रोजी झालेला आहे. सामनेवालाने अर्जदाराच्या चा़रित्र्यावर संशय घेऊन तिचेवर खोटे आरोप करुन तिला हाकलून दिले आहे व विनाकारण तिचा त्याग केलेला आहे व तेंव्हापासून ती तिचे वयस्कर आईवडीलांकडे धर्मार्थी जिवन जगत आहे. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट सामनेवाला हा सांगी इंडस्ट्रीज, सांगीपुरम, ता.अबडसा, जि.कच्छ येथील कंपनीत इंजिनियर म्हणून कायमस्वरुपी नोकरीस असून त्यास दरमहा रु.०१,५०,०००/– चे दरम्यान पगार आहे. तिला दैनंदिन खर्चासाठी व उपजिवीकेसाठी पोटगी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदाराने दरमहा रु.१५,०००/– अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

३. सामनेवाला याने निशाणी २१ अन्वये म्हणणे सादर करुन अर्जदाराच्या अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा असून तो मान्य नसल्याचे कथन केले आहे. सामनेवालाने त्याच्या उत्पन्नाबाबत अर्जदाराने तिच्या अर्जात नमूद केलेला मजकूर नाकारलेला आहे. सामनेवालाचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही व्यभिचारी असलेबाबत सामनेवालाचे

म्हणणे असून त्यामुळे तिला कायदयाने पोटगी मागता येणार नाही. अर्जदाराचे बारावी पर्यंतचे शिक्षण झालेले असून ती माहेरी राहून ब्युटी पार्लर व शिवणकाम करुन प्रतिमहिना १५ ते २० हजार रुपये कमाविते. अर्जदार ही माय लाईफस्टाईल कंपनीत टीम कोऑर्डीनेटर म्हणून नोकरी करीत असून तिला त्यापासून दरमहा १५ ते १८ हजार रुपये पगार आहे. याउलट सामनेवाला हा मुलगी श्रेया व मुलगा श्रेयश यांच्या शिक्षणाचा खर्च करीत आहे. सामनेवाला यांची आई वयस्कर असून तिच्या दवाउपचाराचा खर्च हा सामनेवाला यास करावे लागते. तसेच सामनेवालास घरभाडे, मुलांच्या शिक्षणाचे कर्जहप्ते, दवाउपचार इत्यादी खर्चातून पैसे शिल्लक राहत नाहीत. त्यामुळे सामनेवालाची अंतरिम पोटगी देण्याची ऐपत नाही. केवळ सामनेवाला यास त्रास देण्यासाठी पाच वर्षांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदाराने फौ.प्र.सं. कलम १२५ प्रमाणे अंतरीम पोटगीकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. फौ.प्र.सं.कलम १२५ चे अवलोकन करता पत्नी, अपत्ये आणि आईबाप यांच्या निर्वाहाकरीता आदेश — (१) पुरेशी ऐपत असताना जर कोणत्याही इसमाने –

> (अ) स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आपल्या पत्नीचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली किंवा तो करण्यास नकार दिला तर, अशी उपेक्षा किंवा नकार शाबीत झाल्यानंतर पत्नी, अपत्ये आणि आईबाप यांना निर्वाहाकरीता मासिक दराने मासिक भत्ता देण्याबाबत आदेश करता येतो.
>
> आणखी असे की, या पोटकलमाखालील

निर्वाहासाठीच्या मासिक भत्याच्या संबंधातील कार्यवाही प्रलंबित असताना, अशा व्यक्तीला तिच्या पत्नीला, किंवा अशा अपत्याच्या किंवा बापाच्या किंवा आईच्या अंतरिम निर्वाहाकरीता दंडाधिकारी मासिक भत्ता आणि वाजवी असा कार्यवाहीचा खर्च देण्याबाबत आदेश देऊ शकेल.

५. अर्जदाराच्या कथनानुसार अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दिनांक २०/०५/२००३ रोजी झालेला आहे. सामनेवाला याने त्याचे म्हणण्यात अर्जदार व त्याचे मधील नातेसंबंध कुठेही अमान्य अथवा आव्हानीत केलेले दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला हे पती–पत्नी असल्याचे दिसते. अर्जदार व सामनेवाले यांचे अनुक्रमे अर्ज व म्हणण्याचे अवलोकन करता अर्जदार ही सध्या अकलूज येथे राहत आहे असे दिसते. अर्जदाराने तिच्या अर्जात सामनेवाला हा सांगी इंडस्ट्रीज, सांगीपुरम, ता.अबडसा, जि.कच्छ येथील कंपनीत इंजिनियर म्हणून कायमस्वरुपी नोकरीस असून त्यास दरमहा रु.०१,५०,०००/– चे दरम्यान पगार आहे असे कथन केले आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या सामनेवालाच्या पगारपत्रकाचे अवलोकन करता सामनेवाला हा संघी सिमेंट या कंपनीत असिस्टंट मॅनेजर या पदावर कार्यरत असल्याचे व त्यास मासीक रक्कम रु.७६९००/– पगार असल्याचे दिसते. तसेच अर्जदाराने यादी निशाणी २७ सोबत मौजे गिरझणी येथील सातबारा उताऱ्याची प्रत, ग्रामपंचायत गिरझणी यांचेकडील मालमत्ता क्र.६३१ च्या असेसमेंट उताऱ्याची प्रत, फेरफार क्र.४४३४ चा ६–ड चा उतारा व मौजे शेळगी, ता. उत्तर सोलापूर येथील भूमापन क्र.२९७ चा उतारा दाखल केलेला आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन करता अर्जदाराचे नावे मौजे गिरझणी येथील मालमत्ता क्र.६३१ असल्याचे दिसून येते. तसेच मौजे शेळगी येथील भूमापन क्र.२९७ च्या उताऱ्यावर

समाईकात सामनेवालाचे नाव असल्याचे दिसते. त्यामुळे एकंदरीत सामनेवाला यास नोकरीपासून तसेच सदर मिळकतीतून उत्पन्न असल्याचे दिसते. सामनेवालाने त्याच्या म्हणण्यात अर्जदार माहेरी राहून ब्युटी पार्लर व शिवणकाम करुन प्रतिमहिना १५ ते २० हजार रुपये कमाविते तसेच ती माय लाईफस्टाईल कंपनीत टीम कोऑर्डीनेटर म्हणून नोकरी करीत असून तिला त्यापासून दरमहा १५ ते १८ हजार रुपये पगार आहे असे कथन केलेले आहे. तथापी, सामनेवाला याने देखील अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही व केवळ मोघमपणे अर्जदार हिस वरील प्रमाणे उत्पन्न असल्याचे कथन केले आहे. एकंदरीत, अर्जदार ही सामनेवाला याची पत्नी आहे. त्यामुळे निश्चितच अर्जदारास सांभाळण्याची व तिच्या उदरनिर्वाहाची नैतीक व कायदेशीर जबाबदारी ही सामनेवाला याची आहे. त्यामुळे अर्जदाराच्या दैनंदिन मूलभुत गरजा भागविण्यासाठी अंतरिम निर्वाह भत्ता मिळण्यास ती पात्र आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला याने प्रस्तुत पोटगी अर्जाच्या दिनांकापासून दरमहा रु.५०००/– अंतरिम निर्वाह भत्ता अर्जदारास दयावयाचे आहे.

३. सामनेवाला याने प्रस्तुत अर्जाच्या खर्चाकामी रक्कम रु.२०००/– अर्जदार हिस दयावेत.

माळशिरस
दिनांक – ११/१०/२०२३

(एस.यू.न्याहारकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी माळशिरस